# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-**
**{सा.बां.वि. झोन क्र. ०४}** गांधीसागर तलावाचे मजबुतीकरण व सौंदर्यकरण करण्याचे काम दोन टप्प्यात करण्याचे असुन प्रथम टप्प्याचे काम सध्या सुरू आहे. प्रथम चरणात रू. 38.15 कोटीचा प्रस्ताव व द्वितीय चरणात रू. 11.66 चा प्रस्ताव असा एकूण रू. 49.82 चा प्रस्तावास शासनाने मान्यता प्रदान केलेली असुन, या कामाच्या द्वितीय चरणाचे रू. 11.66 कोटींच्या कामाचे नव्याने रितसर निविदा मागवाव्या लागतील. याकरिता मा. आयुक्त यांची दि.16.06.2023 रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे. द्वितीय चरणामध्ये (1) Construction of Multiproposed Hall याची रू. 8.73 कोटी व (2) Fountain (Musical fountaining in the lake aeration) याची रू.2.93 कोटीच्या वेगवेगळया निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:-

1) सदर काम "पद क्र. A20170913 (महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोया सुविधांचा विकास") म.न.पा. नागपूर मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी प्रस्तावित आहे.
2) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्धआहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 466/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 28/07/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धंतोली झोन क्र. ०४ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार गांधीसागर तलावाचे मजबुतीकरण व सौंदर्यकरण करण्याचे काम दोन टप्प्यात करण्याचे असुन प्रथम टप्प्याचे काम सध्या सुरू आहे. प्रथम चरणात रू. 38.15 कोटीचा प्रस्ताव व द्वितीय चरणात रू. 11.66 चा प्रस्ताव असा एकूण रू. 49.82 चा प्रस्तावास शासनाने मान्यता प्रदान केलेली असुन, या कामाच्या द्वितीय चरणाचे रू. 11.66 कोटींच्या कामाचे नव्याने रितसर निविदा मागवाव्या लागतील. याकरिता मा. आयुक्त यांची दि.16.06.2023 रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे. द्वितीय चरणामध्ये (1) Construction of Multiproposed Hall याची रू. 8.73 कोटी व (2) Fountain (Musical fountaining in the lake aeration) याची रू.2.93 कोटीच्या वेगवेगळया निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**